मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 26 डिसेंबर 2025 | पान- 1

# समाजकारणातून सुशासनाचा ध्यास प्रभाग १२ साठी खंबीर नेतृत्व: मा. प्रवीण भालेकर

## विकसनशील प्रभाग : 12

**पिंपरी : पिंपरी चिंचवडच्या राजकारणात आणि समाजकारणात स्वतःच्या कष्टाने आणि निष्ठेने अढळ स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्रभाग १२ चे प्रवीण भालेकर. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून गेल्या २५ ते ३० वर्षांपासून समाजसेवेचे व्रत अंगीकारलेल्या भालेकर यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. कोणतीही राजकीय किंवा कौटुंबिक पार्श्वभूमीचा वारसा नसताना केवळ जनसेवेच्या तळमळीतून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली.**






सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण ठेवून आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता या परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. या निःस्वार्थी कामाची पावती म्हणून सन २०१५ मध्ये आमदार महेश दादा लांडगे यांनी फ प्रभाग स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्याची संधी दिली. त्या माध्यमातून महापालिका संबंधित प्रलंबित कामांचा पाठपुरावा करून ती पूर्ण करण्यात यश मिळाले.





२०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत विजयी होऊन पहिल्यांदा महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. प्रभागातील रस्त्यांचे डांबरीकरण, काँक्रीट रस्ते, नाले बांधकाम, पेव्हिंग ब्लॉक, ड्रेनेज लाईन, स्ट्रीट लाईट, स्टॉर्म वॉटर लाईन, भूमिगत विद्युत वाहिनी याबरोबरच उद्यान, अद्ययावत स्मशानभूमी, प्रवेशद्वार, शिवाजी महाराज पुतळा सुशोभीकरण यासह बायोडायव्हर्सिटी पार्क, संत तुकाराम महाराज प्रवेशद्वार यासारखे प्रकल्प मार्गी लावले.

प्रवीण भालेकर यांच्या समाजकार्याची खरी प्रचिती कोरोनाच्या भीषण संकटात आली. जेव्हा जग भीतीच्या छायेखाली होते, तेव्हा भालेकर कुटुंब आपला जीव धोक्यात घालून नागरिकांच्या मदतीला धावून गेले. माणुसकीच्या नात्याने त्यांनी स्वतःच्या शेतातील गहू व जीवनावश्यक वस्तूंचे किट दोन हजार नागरिकांना मोफत वाटप केले. सेवाभावी संस्थांच्या मदतीने परप्रांतीय नागरिकांना भोजनाची व्यवस्था केली. या सेवायज्ञात त्यांना स्वतःला कोरोनाची गंभीर बाधा झाली. प्रकृती इतकी खालावली होती की पुन्हा सुखरूप परतेल की नाही याची खात्री नव्हती; परंतु त्यांनी केलेल्या पुण्याईने आणि हजारो नागरिकांच्या आशीर्वादाने त्यांनी मृत्यूवर मात केली आणि ते पुन्हा जोमाने जनसेवेत सक्रिय झाले.

महिला सक्षमीकरण आणि तरुणांच्या प्रगतीसाठी त्यांनी राबविलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली १०० हून अधिक महिला बचत गट कार्यरत आहेत, जे या भागातील सर्वाधिक गट मानले जातात. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांनी 'होम मिनिस्टर', रास दांडिया यांसारखे कार्यक्रम आयोजित करून एक हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले आहे. शिक्षणाप्रती असलेली त्यांची आस्था '१०० विद्यार्थी दत्तक' घेण्याच्या उपक्रमातून दिसून येते, ज्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च ते स्वतः उचलतात. पायाभूत सुविधांच्या बाबतीतही त्यांनी मोलाचे काम केले आहे.



विशेषतः श्रीराम कॉलनी, स्वराज पार्क परिसरातील कमरेपर्यंत साचणाऱ्या पाण्याचा प्रश्न त्यांनी 'स्टॉर्म वॉटर' व नाला बांधकाम योजनेच्या यशस्वी पाठपुराव्यातून कायमचा मार्गी लावला असून, परिसरातील ३० ते ४० रस्त्यांची कामे पूर्णत्वास नेली आहेत. रेड झोनच्या तांत्रिक अडचणींमुळे प्रभाग क्रमांक १२ च्या विकासात काही अडथळे येत असले तरी, सत्तेच्या माध्यमातून हे प्रश्न सोडवण्याचा त्यांचा ठाम निर्धार आहे.

आगामी काळात आमदार महेश दादा लांडगे यांच्या साथीने सांडपाणी व्यवस्थापनाची प्रभावी यंत्रणा, अखंडित वीजपुरवठा, वाहतूक कोंडीतून मुक्ती आणि स्वच्छ व मुबलक पाणी घराघरात पोहोचवणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे. यासोबतच तरुणांसाठी रोजगार उपलब्ध करणे आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्याचे त्यांचे स्वप्न आहे. 'स्वच्छ प्रभाग, सुंदर प्रभाग' हे केवळ ब्रीदवाक्य नसून त्यांच्या कार्याचे मुख्य लक्ष्य आहे. प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे रूपांतर संधीत होईल आणि नागरिकांचा भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करत प्रवीण भालेकर आजही जनसेवेसाठी अहोरात्र झटत आहेत.








